**ठळक बातम्या**

- भारत टेक्स प्रदर्शनातून भारतीय संस्कृती आणि विकसित भारताच्या भविष्याचं चित्र दिसत असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- नवी दिल्ली स्थानकावरच्या दुर्घटनेच्या चौकशीसाठी रेल्वेची समिती स्थापन/ दुर्घटनेची जबाबदारी स्वीकारुन रेल्वेमंत्र्यांनी राजीनामा द्यावा अशी काँग्रेसची मागणी

- गेल्या पंधरवड्यात भारतीय भांडवल बाजारातून २१ हजार २७२ कोटी रुपयांची परदेशी गुंतवणूक माघारी

**आणि**

- नांदेडहून अयोध्येला जाणाऱ्या भाविकांच्या वाहनाला झालेल्या अपघातात ४ जणांचा मृत्यू, १६ जखमी

**<><><><><>**

भारत टेक्स प्रदर्शनातून भारतीय संस्कृती आणि विकसित भारताच्या भविष्याचं चित्र दिसत असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं. नवी दिल्लीत भारत मंडपम् इथं आयोजित भारत टेक्स २०२५ मध्ये बोलत होते. भारत टेक्स आता जागतिक पातळीवरचा महोत्सव झाला असून हे प्रदर्शन जगभरातल्या कापड उद्योजकांसाठी एक चांगलं व्यासपीठ बनलं आहे. वेगवेगळ्या देशांची कापड संस्कृतीविषयीच्या माहितीची देवाणघेवाण या प्रदर्शनाच्या निमित्ताने होत आहे, असंही प्रधानमंत्री यावेळी म्हणाले.

गेल्यावर्षी आपण कापड उद्योगात फार्म, फायबर, फॅब्रिक, फॅशन आणि फॉरेन या पाच घटकांविषयी बोललो होतो. हे धोरण आता भारतासाठी महत्त्वपूर्ण धोरण

झालं आहे. या धोरणातून शेतकऱ्यांपासून ते व्यापाऱ्यांपर्यंत प्रगतीच्या नव्या वाटा मिळत आहेत. आपण जगातले सर्वात मोठा कापड निर्यातदार देश आहोत. आतापर्यंत तीन लाख कोटींपर्यंत ही निर्यात झाली असून २०३० पर्यंत हीच रक्कम ९ लाख कोटींवर घेऊन जाणं हेच आपलं लक्ष्य आहे, असंही मोदी यावेळी म्हणाले.

भारत टेक्स हे आंतरराष्ट्रीय पातळीवरचं भव्य वस्त्रोद्योग प्रदर्शन असून ते उद्यापर्यंत सुरू राहणार आहे. यामध्ये कच्च्या मालापासून ते तयार उत्पादनांपर्यंत विविध उत्पादनं आणि यंत्रसामुग्रीचा समावेश आहे. प्रदर्शनाबरोबरच विविध चर्चासत्र आणि प्रशिक्षण कार्यक्रमही घेतले जात आहेत. नवोन्मेष उपक्रम आणि स्टार्ट अप दालन तसंच हॅकेथॉनवर आधारित स्टार्टअप पिच फेस्ट आणि निधी योजना असे कार्यक्रम, तसंच डिझाइन स्पर्धाही घेण्यात येत आहेत . ५ हजार हून अधिक प्रदर्शक, १२० हून अधिक देशांतील ६००० आंतरराष्ट्रीय खरेदीदार आणि इतर विविध अभ्यागत या प्रदर्शनात सहभागी होण्याची अपेक्षा आहे.

**<><><><><>**

नवी दिल्ली स्थानकावर काल रात्री चेंगराचेंगरी होऊन किमान १८ जणांचा मृत्यू झाल्याप्रकरणी चौकशी करण्यासाठी उत्तर रेल्वेचे मुख्य वाणिज्य व्यवस्थापक नरसिंह देव आणि मुख्य सुरक्षा आयुक्त पंकज गंगावार यांची समिती रेल्वेनं नेमली आहे. या समितीनं स्थानकावरचे सीसीटीव्ही फूटेज राखून ठेवायचे निर्देश दिले आहेत.

प्रयागराजला जाणाऱ्या गाड्यांमध्ये चढण्यासाठी अचानक अलोट  गर्दी झाली होती. फलाट क्रमांक १४ आणि १५ वर उतरण्यासाठी असलेल्या पुलावरुन उतरताना काहीजण घसरले त्यामुळे गर्दीतली माणसं एकमेकांवर कोसळल्यामुळे चेंगराचेंगरी झाल्याचं उत्तर रेल्वेच्या मुख्य जनसंपर्क अधिकाऱ्यांनी सांगितलं. मृतांच्या कुटुंबांना प्रत्येकी दहा लाख रुपयांची मदत जाहीर करण्यात आली आहे.

नवी दिल्ली स्थानकावर परिस्थिती आता नियंत्रणात असल्याची माहिती रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली. नवी दिल्ली स्थानकावरची गर्दी कमी करण्यासाठी दिल्लीहून प्रयागराजला जाण्यासाठी तात्काळ चार गाड्या सोडल्या असल्याचंही त्यांनी सांगितलं. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनीही अश्विनी वैष्णव तसंच दिल्लीच्या नायब राज्यपालांशी चर्चा केली. जखमींना तत्काळ आवश्यक ती मदत पुरवण्याचे निर्देश त्यांनी दिले.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, यांनी या घटनेबद्दल तीव्र दुःख व्यक्त केलं आहे. दुर्घटनेत मरण पावलेल्यांच्या प्रियजनांचं त्यांनी सांत्वन केलं असून जखमी झालेल्यांना लौकर बरं वाटावं, अशी कामना केली आहे. प्रधानमंत्री  नरेंद्र मोदी यांनीही दुर्घटनेबद्दल तीव्र शोकभावना प्रकट केली आहे.

नवी दिल्ली रेल्वे स्थानकावर झालेल्या दुर्घटनेची बातमी दुःखद आणि वेदनादायक आहे, अशा शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी दुःख व्यक्त केलं आहे. महाकुंभातून आणलेल्या गंगाजलाचा लाभ घेण्यासाठी नागपूरमधे आयोजित कार्यक्रमानंतर ते बातमीदारांशी बोलत होते.

**<><><><><>**

नवी दिल्ली रेल्वे स्थानकावरच्या दुर्घटनेची जबाबदारी स्वीकारुन  रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी राजीनामा द्यावा अशी  मागणी काँग्रेसनं केली आहे. काँग्रेसच्या पक्ष प्रवक्ता सुप्रिया श्रीनेत यांनी आज नवी दिल्लीत  पत्रकार परिषद घेतली. दुर्घटनेच्या वेळी बचावकार्याऐवजी सरकार आकडे लपवण्यात गुंतलं होतं असा आरोप त्यांनी केला. दुर्घटनेच्या आधी तासाभरात पंधराशेहून अधिक तिकिटं विकली गेली होती, त्यामुळे रेल्वेला गर्दीचा अंदाज यायला हवा होता, असं त्या म्हणाल्या.

**<><><><><>**

सोलापूर शहर तसंच आजूबाजूच्या गावांना पाणी मिळण्यासाठी उद्या सकाळ पासून उजनी धरणातून भीमा नदीत पाणी सोडलं जाणार आहे. सुरुवातीला सोळाशे, तर नंतर सहा हजार क्युसेक वेगानं हे पाणी सोडलं जाईल.

**<><><><><>**

भारतीय भांडवली बाजारामधून परदेशी गुंतवणूकदारांनी फेब्रुवारीच्या पहिल्या पंधरवड्यात २१ हजार २७२ कोटी रुपयांची गुंतवणूक काढून घेतली आहे. जानेवारीत एकंदर ७८ हजार २७ कोटी रुपयांची परदेशी गुंतवणूक झाली होती. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी इतर देशांमधून आयात मालावर अतिरिक्त शुल्क आकारण्याची घोषणा केल्यानंतर परदेशी गुंतवणूकदार संस्थांनी सावध पवित्रा घेतला असावा, असं बाजार वर्तुळातल्या तज्ज्ञांचं मत आहे.

**<><><><><>**

उत्तर प्रदेशात बाराबंकी इथं पूर्वांचल एक्सप्रेस वे वर आज पहाटे झालेल्या अपघातात ४ जणांचा मृत्यू झाला, तर १६ जण जखमी झाले.

नांदेडहून अयोध्येला जाणाऱ्या भाविकांची ही टेंपो ट्रॅव्हलर गाडी, चालकाचं नियंत्रण सुटल्यानं रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या नादुरुस्त बसला धडकून हा अपघात झाला. प्रवाशांपैकी एकाचा जागीच मृत्यू झाला तर ३ जण उपचारादरम्यान मरण पावले. अपघातात मरण पावलेले चौघेही नांदेड जिल्ह्यातले आहेत. मृतांमध्ये २ महिलांचा समावेश आहे.

**<><><><><>**

महिलांनी पुढाकार घेतला, तर एखादी सहकारी बँक यशाच्या शिखरावर पोहचते, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी म्हटलं आहे. ते आज चंद्रपूर जिल्ह्यातल्या सन्मित्र महिला नागरी सहकारी बँकेचा रौप्यमहोत्सवी वर्धापन दिन सोहळ्यात बोलत होते. महिलांना अर्थकारण चांगलं कळतं असं ते म्हणाले…

**होल्ड बाईट :- देवेन्द्र फडणवीस, मुख्यमंत्री (२८ सेकंद)**

सन्मित्र महिला नागरी सहकारी बँक ही याचं मूर्तीमंत उदाहरण असल्याचं ते म्हणाले. चंद्रपूर जिल्ह्याचे संपर्क मंत्री अशोक उईकेही या कार्यक्रमाला उपस्थित होते. या बँकेनं गेल्या २५ वर्षात ३०० कोटी भाग भांडवल उभं करतानाच पाच दशांश NPA ठेवला आहे, ही अभिमानाची बाब असल्याचं ते म्हणाले.

**<><><><><>**

नाशिक महापालिकेनं २०२५-२६ वर्षासाठी ३ हजार ५४ कोटी रुपयांचं अंदाजपत्रक आज स्थायी समितीला सादर केलं. महापालिकेनं दोन वर्षांनी होणार असलेल्या सिंहस्थ कुंभमेळ्यासाठीच्या पायाभूत सुविधांच्या उभारणीसाठी दोनशे कोटींच्या ठेवी मोडायचा निर्णय घेतला आहे. सिंहस्थासाठीच्या पाणीयोजना करण्यासाठी ३२८ कोटी ९० लाख रुपयांची, तर शिक्षण विभागासाठी २३ कोटी ४५ लाख रुपयांचा निधीची राखीव तरतूद केली आहे.

**<><><><><>**

लातूर जिल्ह्यात मुरुड इथं आज दुपारी चालकाचा स्कॉर्पिओ गाडीवरचा ताबा सुटल्यानं ती रस्त्याच्या बाजूला असलेल्या उपहारगृहात घुसून झालेल्या अपघातात एकाचा मृत्यू झाला, तर सात जण जखमी झाले. ही गाडी पुण्यावरून लातूरला लग्नासाठी जात होती. वेगात आलेल्या गाडीनं छोटी संरक्षण भिंत तोडून उपहारगृहातल्या ग्राहकांना चिरडलं.

**<><><><><>**

मुंबईतल्या मस्जिद बंदर भागात आज सकाळी एका इमारतीला लागलेल्या आगीत २ महिलांचा मृत्यू झाला तर ५ जण जखमी झाले. धुरामुळे गुदमरून जखमी झालेल्यांवर जे जे रुग्णालयात उपचार सुरु आहेत. पोलीस आणि अग्निशमन दलानं घटनास्थळी धाव घेऊन आग आटोक्यात आणली आहे. पोलीस आगीच्या कारणांचा तपास करत आहेत.

**<><><><><>**

कोलकाता इथे सुरू असलेल्या इंडियन सुपर लीग फुटबॉल स्पर्धेत आज ईस्ट बंगाल संघाचा सामना मोहम्मदन स्पोर्टिंग या संघाशी होणार आहे. हा सामना संध्याकाळी साडे सात वाजता सुरू होईल. या स्पर्धेच्या प्लेऑफ फेरीत स्थान मिळवण्यासाठी हे दोन्ही संघ आज लढत देणार आहेत.

**<><><><><>**

गेल्या चोवीस तासात मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी, किमान तापमानात किंचित वाढ झाली. राज्यात सर्वात कमी किमान तापमान जळगाव इथं ११ अंश सेल्सिअस इतकं नोंदवलं गेलं.

येत्या दोन दिवसात राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे.

**//<><><><><>//**